Sakal Pune Today, April 27, 2015 Pp.10

# नभातील हसऱ्या ताऱ्यांचे उलगडले गुपित

## नारळीकर दांपत्याकडून खगोल आणि गणितावर मनमोकळ्या गप्पा

पुणे, ता. २६ : 'बिग बॅंग'ची संकल्पना अन् ग्रहांच्या निर्मितीचे रहस्य आणि नभातील हसऱ्या ताऱ्यांचे गोड गुपित ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर आणि गणिततज्ज्ञ मंगला नारळीकर यांच्या गप्पांमधून रविवारी उलगडले.

आनंदयात्रा एकाकी स्वमदत गटाच्या वतीने नारळीकर दांपत्याशी गप्पांचा कार्यक्रम आयोजिला होता. या कार्यक्रमात गटाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. हेमंत देवस्थळी उपस्थित होते. डॉ. नारळीकर यांनी खगोलशास्त्रातील वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगितला. विज्ञानाचा आधार घेत समाजात सध्या अंधश्रद्धा बळावत असल्याची खंत व्यक्त करत ते म्हणाले, "माणसाला असुरक्षितता किंवा कसली तरी भीती वाटू लागते, तेव्हा तो अंधश्रद्धांच्या आहारी जातो. अनेक वैज्ञानिक आजही सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रयोगशाळेत असतात आणि घरी आल्यावर कर्मकांडात गुंतलेले दिसतात. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून प्रश्न सोडविले पाहिजेत."

विज्ञानकथा लिहिण्यामागील हेतू सांगताना डॉ. नारळीकर म्हणाले, "मराठीत विज्ञानकथा लिहिण्याचा फारसा प्रयत्न झाला नाही. मात्र इंग्लिशमध्ये त्या तुलनेत विज्ञानकथा अधिक प्रमाणात दिसतात. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी विज्ञान कथा प्रभावी ठरू शकतात, असे मला वाटते."

मंगला नारळीकर म्हणाल्या, "योग्य वयात लग्न आणि त्यानंतर संसार सांभाळून जमेल तेवढे करिअर करायचे, अशा विचारात लहानपणापासून माझी जडणघडण झाली. त्यामुळे लग्नानंतर माझ्या करिअरपेक्षा संसाराचे पारडे जड झाले. संसाराची जबाबदारी अधिक प्रमाणात स्त्रीवर असते आणि विज्ञानाच्या क्षेत्रात काम करायचे असेल, तर त्यात तुम्हाला पूर्णपणे बुडून जावे लागते. त्या वेळी मला ते शक्य नव्हते. मात्र आता मी शिकविण्याचा आनंद घेत आहे, तसेच सतत शिकत राहण्याचा आनंद घेत आहे." या कार्यक्रमात डॉ. देवस्थळी व मृणालिनी काळे यांनी नारळीकर दांपत्यांशी संवाद साधला.

### देव आहे की नाही हा गहन प्रश्न

"देव आहे की नाही हा गहन प्रश्न आहे. देव असण्यावर किंवा नसण्यावर मी काही वक्तव्य केले, तर त्यातून वेगळा अर्थ निघू शकतो. त्यामुळे 'देव आणि विज्ञान' विषयावर आजवर अनेक लिहिले गेले आहे, त्याचा आधार घेऊन ज्याचा-त्याने विचार करावा," असे मत डॉ. नारळीकर यांनी व्यक्त केले.